|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

पत्रपेटी, ८०, उमवि नगर (बांभोरी), जळगाव – ४२५००१

A' Grade NAAC Re-Accredited (4th Cycle)

## विचारधारा प्रशाळा — School of Thought

जा.क्र./कबचौ.उमवि/वि.प्र./137/2025 दिनांक :- 31/12/2025

## दरपत्रक सूचना

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या विचारधारा प्रशाळेअंतर्गत कार्यरत असलेल्या पुज्य साने गुरूजी संस्कार केंद्रामार्फत, समाजामध्ये तसेच शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रामध्ये पूज्य साने गुरूजींचे विचार रूजावेत या उदात्त हेतूने साने गुरूजींनी अनुवादित केलेल्या **"पाश्चिमात्य तत्वज्ञानाची कहाणी"** या मौल्यवान ग्रंथाचे पुर्नप्रकाशन करावयाचे आहे. तरी सदर पुस्तकाच्या छपाई कामाकरिता पंजीकृत ठेकेदारांकडून सिलबंदरित्या दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पुस्तक छपाईचा तपशील | नग संख्या | दर प्रति नग (GSTसह) | एकूण रक्कम (GSTसह) |
|---|---|---|---|---|
| | **साने गुरूजींनी अनुवादित केलेल्या "पाश्चिमात्य तत्वज्ञानाची कहाणी" या मौल्यवान ग्रंथाचे पुस्तक तयार करणे.** | | | |
| 1 | पृष्ठ संख्या साधारणत: 570 ते 575 पाने असतील. | 625 नग | | |
| 2 | पुस्तक छपाई 70 जीएसएम पेपर असावी. | | | |
| 3 | मुखपृष्ट आणि मलपृष्ट चार रंगात छपाई करावी | | | |
| 4 | पुस्तक बांधणी पेपर बॅक बाईडींग असावी | | | |
| 5 | पुस्तकाची साईज 1/8 असावी. | | | |
| | प्रकाशकाने छापावयाच्या प्रतींची संख्या 500 असावी. | | | |

**दरपत्रके सादर करण्यासाठी आवश्यक असलेल्या अटी व शर्तींची माहिती खालीलप्रमाणे.** :-

1. सदर दरपत्रक सुचनेत सहभाग घेण्यासाठी अधिकृत नोंदणी असलेल्या पुरवठादाराची दरपत्रके स्विकारली जातील. त्यासाठी दरपत्रका सोबत शॉप ॲक्ट रजिष्ट्रेशनची/संस्थेची नोंदणी दाखल्याची सत्यप्रत जोडणी आवश्यक आहे.
2. उपरोक्त पुस्तक छपाईचे कामकाज आवश्यक त्या दुरुतींसह पुस्तकांचा अंतीम ड्राफ्ट आपण दिनांक 21 जानेवारी, 2026 पर्यंत प्रशाळेस पाठवावा.
3. वरील प्रमाणे विद्यापीठास भेट स्वरूपात पुरवठा करण्यात येणा-या पुस्तकाच्या 125 प्रतीं व्यतिरिक्त आपण आपल्या स्तरावर मागणीनुसार पुस्तकांची विक्री करु शकता.

4. पुरवठादाराने PAN CARD ची सत्यप्रत जोडणी आवश्यक आहे.

5. पुरवठादाराने GST Certificate ची सत्यप्रत जोडणी आवश्यक आहे.

6. दरपत्रकात नमुद करावयाचे दर हे सर्व करांसह (GST सह) नमुद करण्यात यावेत. त्यासाठी स्वतंत्रपणे सिलबंद पाकीटात लेटरहेडवर सही, शिक्क्यानिशी दर नमुद करून सादर करावेत.

7. सशर्थ दरपत्रकांचा स्विकार केला जाणार नाही.

8. सदरचे पुस्तकांचे संच आपण स्वखर्चाने विद्यापीठाच्या विचारधारा प्रशाळा येथे पोहोच करावे लागतील.

9. कोणतेही कारण न देता दरपत्रके स्विकारण्याचा, फेटाळण्याचा, वरील अटीत संपुर्ण किंवा अंशत: बदल करण्याचा संपुर्ण अधिकार विद्यापीठाने राखून ठेवलेला आहे.

10. सिलबंद पाकीटावर **पुस्तक छपाईचे दरपत्रक** असा स्पष्ट उल्लेख असावा.

11. सदरची सिलबंद दरपत्रके विचारधारा प्रशाळा, कबचौ.उमवि., जळगाव येथे **दि. 10.01.2026** किंवा तत्पुर्वी सादर करण्यात यावेत.

आदेशार्थ स. सादर

**विभागप्रमुख**
पूज्य साने गुरूजी संस्कार केंद्र

1/1/2026

**संचालक,**
**विचारधारा प्रशाळा**
कवयित्री बहिणाबाई चौधरी
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

प्रति,

--------------------------------

--------------------------------

--------------------------------